## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 10/02/2018 (शनिवार)
## (दुपार)

---

### चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत अतुल सुर्यवंशी यांचे घरासमोर येथे दिनांक 09/02/2018 चे 11.15 वाजता फिर्यादी नामे– अब्दुल कंदीर अकबर, वय 27 वर्ष, रा. काटोल रेस्ट हाऊस याने बॅंक ऑफ इंडीया काटोल येथुन 2,00,000/– रू. काढुन प्लेझर गाडीचे डिक्कीत ठेवुन ऑफीस मध्ये कामा करीता आला असता, अज्ञात आरोपीने गाडीची डिक्कीचे कुलुप तोडुन नगदी 2,00,000/– रू. काढुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. तेलरांधे हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 25 किमी. अंतरावर भिवकुंड येथे दिनांक 09/02/2018 चे 14.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जयंदर सुर्यभान पंधारे, वय 35 वर्ष, रा. भिवकुंड याने आरोपी नामे– 1) विनायक नागरे, रा. भिवकुंड यांच्या मुलीचे लग्न तोडल्याचे कारणावरून आरोपी क्र.1 व 2) लखन विनायक नागरे, रा. भिवकुंड यांनी संगनमत करून फिर्यादीस घराबाहेर बोलावुन काठीने डोक्यावर, हातावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. मधुकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर